# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांकः05.04.2026** **वारः रविवार**

---

ठळक बातम्या

- **पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्यापासून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सातवं एलपीजीवाहक भारतीय जहाज मार्गस्थ**
- **वैश्विक ज्ञानाचं भारतीयीकरण आणि भारतीय ज्ञानाचं वैश्विकरण हेच नव्या शैक्षणिक धोरणाचं प्रमुख उद्दिष्ट्य आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचं प्रतिपादन**
- **गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियांच्यासंदर्भात जिल्हास्तरीय समित्यांचं स्वरूप तयार करण्याचा निर्णय**
- **श्री दत्त शिखर संस्थानचे महंत परमपूज्य मधुसूदनजी भारती महाराज यांचं देहावसान आणि**
- **अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धांना सांगली इथं आजपासून प्रारंभ.**

**<u>ग्रीनसानवी</u>**

पश्चिम आशियातील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, भारतीय जहाज 'ग्रीन सान्वी'नं, होर्मुझ सामुद्रधुनी पार केली असून हे जहाज मुंबईच्या दिशेनं रवाना झालं आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अनेक निर्बंध लादले असले तरी भारतीय ध्वज असलेल्या जहाजांना सुरक्षितपणे जाण्याची परवानगी दिली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून गेल्या महिन्याभरात होर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणारं हे सातवं भारतीय जहाज आहे. त्यामध्ये 46 हजार 650 मेट्रिक टन LPG आणि 25 कर्मचारी आहेत. पर्शियन आखाताच्या प्रदेशात, चारशेहून अधिक भारतीय खलाशांसह एकंदर 17 भारतीय जहाजं आहेत. सागरी मालवाहतूक संचालनालय, जहाज मालक कंपन्या आणि परदेशातील भारतीय दूतावास यांच्या संपर्कात असून परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

दरम्यान, पेट्रोलियम आणि भूगर्भ वायू मंत्रालयानं देशभरात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचं म्हटलं आहे. नागरिकांनी पेट्रोल आणि डिझेलची घाबरून खरेदी करणं, तसंच एलपीजीचं अनावश्यक बुकिंग करणं टाळावं, असा सल्ला मंत्रालयानं दिला आहे.
विशेषतः मध्य पूर्वेकडील देशांमध्ये वास्तव्यास असलेल्या भारतीय लोकांची सुरक्षितता ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल तिरुवल्ला इथं एका जाहीर सभेला संबोधित करताना सांगितलं. आखाती देशांसोबत सरकारचे भक्कम संबंध असल्यामुळं या कठीण काळात तिथं राहणाऱ्या भारतीयांचं संरक्षण करण्यास मदत होत असल्याचं ते म्हणाले.

तिकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी 48 तासांचा अंतिम इशारा दिला आहे. अन्यथा इराणला गंभीर परिणामांना सामोरं जावं लागेल असं त्यांनी काल समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**महाराष्ट्रज्ञानसभा**

वैश्विक ज्ञानाचं भारतीयीकरण आणि भारतीय ज्ञानाचं वैश्विकरण करणं, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचं प्रमुख उद्दिष्ट आहे असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूरमध्ये केलं. विश्वेश्वरैया राष्ट्रीय अभियांत्रिकी संस्थेत विविध संस्थांच्या सहयोगानं आयोजित 'महाराष्ट्र ज्ञान सभा- 2026' या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन सत्रात विशेष अतिथी म्हणून मुख्यमंत्री बोलत होते. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशभरातील शिक्षण आणि उद्योग क्षेत्राशी निगडित तज्ज्ञ आणि प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या संदर्भातून विकसित महाराष्ट्रासाठी शिक्षण या संकल्पनेवर आधारित महाराष्ट्र ज्ञान सभेचं आयोजन करण्यात आलं आहे.

**सचिव**

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे सचिव चंचल कुमार यांनी काल पुण्यातील भारतीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्था तसंच राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय या संस्थांना भेट दिली. या दौऱ्यात त्यांनी एफ.टी.आय.आय. मधील नव्यानं उभारण्यात आलेल्या चित्रपट प्रदर्शन कक्ष, संपादन सुविधा आणि चित्रपट निर्मिती स्टुडिओंची पाहणी केली, तसंच चित्रपट निर्मिती आणि संपादन क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि संस्थेमध्ये दिल्या जाणाऱ्या चित्रपट शिक्षण व्यवस्थेचा आढावा घेतला. यानंतर त्यांनी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयाला भेट देऊन, नॅशनल फिल्म हेरिटेज मिशन अंतर्गत सुरू असलेल्या चित्रपटांच्या डिजिटायझेशन प्रकल्पांची माहिती घेतली.

**विहीर-अपघात**

नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी इथं शुक्रवारी रात्री एक मोटर विहिरीत कोसळल्यानं एकाच कुटुंबातील 9 जणांचा मृत्यू झाला. आपत्कालीन व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून मृतांच्या कुटुंबांना 5 लाख रुपये अर्थसहाय्य जाहीर केलं आहे. अशा प्रकारच्या दुर्घटना टाळण्यासाठी विहीरांना कठडे आहेत की नाही याबाबत ऑडिट करण्यात यावं अशा सूचना त्यांनी दिल्या आहेत.

**ईस्टर**

ख्रिस्ती बांधव आज ईस्टरचा सण साजरा करत आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी ख्रिस्ती बांधवांना ईस्टरच्या शुभेच्छा दिल्या आहेत. प्रभू येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा हा दिवस आपल्याला करुणा आणि मानवतेची मूल्यं अंगीकारण्याची प्रेरणा देतो असं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. महाराष्ट्राचे राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी देखील ईस्टरनिमित्त राज्यातील लोकांना शुभेच्छा दिल्या आहेत.

**गर्भाशय**

गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियासंदर्भात, राज्यशासनानं राज्यस्तरीय समिती पुर्नगठीत केली आहे, या समितीचं कामकाज अधिक गतीनं तसंच प्रभावीपणे होण्यासाठी लवकरात लवकर जिल्हास्तरीय समित्यांच्या कामाचं स्वरूप लवकरच ठरविण्याचा निर्णय विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी घेतला आहे. पुणे विधानभवनात गर्भाशय काढून टाकण्याच्या शस्त्रक्रियेसंदर्भात स्थापित राज्य समितीच्या बैठकीत त्या काल बोलत होत्या. आरोग्य विभागाच्यावतीनं सुमारे एक लाख ऊसतोड महिला कामगारांना आरोग्य सेवा पोहचविण्याचं काम झालं आहे. बीड जिल्हा प्रशासनामार्फत स्थलांतरित ऊसतोड मजुरांच्या आरोग्यविषयक समस्यांकरिता प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आलेल्या "मिशन साथी" या उपक्रमाअंतर्गत जिल्ह्यात 770 पैकी 446 आरोग्य

साथींचं प्रशिक्षण पूर्ण करण्यात आलं असून हे उपक्रम इतर जिल्ह्यांनीदेखील राबवावेत, अशा सूचना डॉक्टर गोऱ्हे यांनी केल्या.

**<u>मालवणी</u>**

मराठी भाषा भवनाप्रमाणं लवकरच मालवणी भाषा भवन उभारणार असल्याची घोषणा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी काल कुडाळ इथं केली. मालवणी नटसम्राट मच्छिन्द्र कांबळी यांचा जन्मदिवस मालवणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो, त्यानिमित्त कुडाळ इथं आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ दशावतारी कलाकार ओमप्रकाश चव्हाण यांना कला सिंधू सन्मान पुरस्कार; राणे यांच्या हस्ते देऊन यावेळी गौरवण्यात आलं.

**<u>लोटेकंपनी</u>**

'रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे एमआयडीसीमध्ये असलेला लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड हा प्रकल्प पूर्णपणे सुरक्षित आहे. पर्यावरणाला किंवा कोणाच्याही जीविताला हानिकारक असा कोणताही पदार्थ कंपनीतून बाहेर सोडला जात नसल्याची माहिती या प्रकल्पाच्या उत्पादन विभागाचे वरिष्ठ उपाध्यक्ष दीपक पाटील यांनी काल रत्नागिरीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. इटलीतल्या मितेनी या कंपनीसोबत केली जाणारी या प्रकल्पाची तुलना चुकीची असल्याचं त्यांनी सांगितलं. या संदर्भातली चित्रफीत गेल्या काही दिवसांपासून पसरत असून, त्यामुळं या प्रकल्पाविरोधात आंदोलनं सुरू आहेत.

**<u>निधन</u>**

श्री क्षेत्र माहूर गड इथल्या श्री दत्त शिखर संस्थानचे महंत परमपूज्य मधुसूदनजी भारती महाराज यांचं काल सायंकाळी देहावसान झालं. ते 95 वर्षांचे होते. अत्यंत साधेपणा, अध्यात्मिक चिंतन आणि भक्तीभावासाठी ते ओळखले जात होते. त्यांनी आपल्या कार्यकाळात श्री दत्त शिखर संस्थानच्या धार्मिक परंपरा जपण्याबरोबरच भक्तांच्या सेवेसाठी स्वतःला अर्पण केलं होतं. आपल्या प्रवचनांमधून त्यांनी अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि संस्कार यांचा संदेश भाविकांपर्यंत पोहोचवला. अनेक संत, महंत तसंच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पार्थिव देहावर आज दुपारी 3 वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>कनोईंग -कयाकींग-सांगलीपीटीसी</u>**

भारतीय विद्यापीठ महासंघ आणि शिवाजी विद्यापीठाद्वारे आयोजित अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग आणि कयाकिंग स्पर्धांना सांगली इथं आजपासून प्रारंभ होत आहे. या स्पर्धेत देशभरातील 40 विद्यापीठांमधून 685 पुरुष आणि महिला खेळाडू सहभागी होणार आहेत. कयाकिंगमध्ये K1, K2, K4 तसंच कनोईंगमध्ये C1, C2 अशा 200, 500 आणि 1000 मीटर प्रकारात या स्पर्धा होतील.

**<u>हवामान</u>**

मराठवाडा आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांसह वादळ, हलका ते मध्यम पाऊस आणि ताशी 30 ते 40 किलोमीटर वेगानं वारे वाहण्याची दाट शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.